४) **'शिक्षण सेवक'** म्हणून कार्यरत शिक्षकांच्या नावासमोर **शिक्षण सेवक** अशी नोंद करावी.

५) परीक्षेच्या कालावधीत एखादा शिक्षक सेवानिवृत्त होत असेल तर त्यांच्या नावाची शिफारस करु नये. तसेच सर्व शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचा दिंनाक प्रपत्रातील रकान्यात नमुद करावा.

६) एखाद्या शिक्षकाला मंडळाने मंडळाच्या कामाकरीता प्रतिबंध( Debarred) केले असल्यास किंवा न्यायालयीन प्रकरण प्रविष्ठ असल्यास प्रपत्रातील रकान्यात तसा स्पष्ट उल्लेख करावा.

७) परीक्षा काळात त्वरित संपर्कासाठी सर्वांनी आपला मोबाइल क्रंमाक अचूक व स्पष्ट लिहावा.तसेच प्रपत्रातील ( पॅनल फार्म ) कोणताही रकाना निरंक ठेऊ नये.मुख्याध्यापकानी स्वतःचा इ मेल आयडी तयार करुन प्रपत्रात नमुद करावा. तसेच शाळेतील सर्व शिक्षकांचा इ मेल आयडी तयार करुन पॅनल फॉर्ममध्ये नमुद करावेत.

८) पॅनल फॉर्ममध्ये मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्यासहीत सर्व शिक्षक / कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक यांची नावे पाठवीणे आवश्यक आहे.

**फेब्रुवारी / मार्च व जुलै / ऑगस्ट २०१९ परीक्षेकरीता सादर केलेली माहिती अपूर्ण असल्याने तसेच शिक्षकांची माहिती शिफारस प्रपत्रात नमूद न केल्याने काही शिक्षकांच्या व शिक्षक संघटनांच्या तक्रारी मंडळाकडे येतात. आगामी परीक्षेमध्ये असे होऊ नये यासाठी सर्व मुख्याध्यापकांनी / प्राचार्यांनी माहिती देतांना आपल्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या सर्व शिक्षकांची अचूक माहिती शिफारस प्रपत्रात नमूद करुन त्यांच्या नावासमोर संबंधित शिक्षकांची स्वाक्षरी घेऊन दिंनाक ३१/०७/२०१८ पर्यंत मंडळाकडे हस्तपोच किंवा पोष्टाद्वारे न चूकता पाठविण्यात यावे.**

( रविकांत देशपांडे )
विभागीय सचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

प्रत अग्रेषित :-

१) शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
२) शिक्षणाधिकारी माध्यमिक भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा, गडचिरोली, गोंदिया